साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख • VISHVANAYAK Mo.8686888898

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - ४४ ■ मंगळवार दि.२७ ऑक्टोंबर २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 44 ■ Tuesday Dt. 27 October 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

## बीडमध्ये अनधिकृत नळ कनेक्शन तोडण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिके अंतर्गत मुख्य जलवाहिनी मधून अनेक बड्या लोकांनी नळ कनेक्शन घेतले असल्याचे उघड झाले आहे यामुळे पाण्याची नासाडी देखील होत आहे.

बीड शहरात पाणी बचतीसाठी नगरपालिका प्रशासनाने कंबर कसली असून, मुख्य जलवाहिनीवरून घेतलेल्या अनधिकृत नळजोडण्यांविरोधात कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या दोन दिवसांत कारवाईला सुरुवात होणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता माने यांनी दिली.

सध्या उन्हाळा आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन शासन व प्रशासनाकडून केले जात आहे. मात्र, बीड शहरातील मुख्य पाइपलाइनवर अनेक अनधिकृत नळजोडण्या असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि पाणी बचतीच्या उपाययोजनांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता माने यांच्या हस्ते सर्व सुपरवायझरना पाणी बचतीबाबत जनजागृती करण्यासाठी तसेच मुख्य पाइपलाइनवरील अनधिकृत जोडण्या बंद करण्याच्या कारवाईसाठी माइक देण्यात आले. संबंधित कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृती केली जाणार आहे.

मुख्य जलवाहिनीवरून अनधिकृत जोडण्या घेणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याचे संकेत नगरपालिका प्रशासनाने दिले आहेत. येत्या दोन दिवसांत प्रत्यक्ष कारवाई सुरू होणार असल्याने किती अनधिकृत जोडण्या बंद केल्या जातात आणि संबंधितांवर किती गुन्हे दाखल होतात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# बीडमध्ये अवैध सावकारांचे दिवस भरले!

## शेतकऱ्यांनो, मुजोरी सहन करू नका; एका व्हॉट्सपवर सावकारांची मग्रुरी उतरणार!

**बीड । जिमाका**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसलेले अवैध सावकार, मुजोर मायक्रो फायनान्स कंपन्या आणि नवीन पीक कर्ज वाटपात आडकाठी आणणाऱ्या बँकांवर कारवाई करण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने कठोर पाऊल उचलले आहे. वाढत्या तक्रारी आणि 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' च्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्यासाठी स्वतंत्र जिल्हास्तरीय तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. पिळवणूक करणाऱ्यांवर थेट अंकुश ठेवण्यासाठी ९३०७३२५५८६ हा २४ तास सुरू राहणारा व्हॉट्सप क्रमांक जारी करण्यात आला असून, पीडितांना तात्काळ लेखी तक्रारी नोंदवण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.



प्रतिकात्मक छायाचित्र

या धडक निवारण कक्षाचे प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी सतिश सोनी यांची नियुक्ती करण्यात आली असून, सहायक निबंधक ऋषिकेश कातळे आणि सहायक लीड बँक व्यवस्थापक श्रीकांत लोखंडे सदस्य म्हणून थेट मैदानात उतरणार आहेत.जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, 'महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४' अंतर्गत बेकायदेशीर सावकारी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांची गय केली जाणार नाही.

मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खाजगी वित्तीय संस्थांना प्रशासनाने सक्त ताकीद दिली आहे. वसुलीसाठी गुंड प्रवृत्तीच्या किंवा गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांचा वापर केल्यास थेट गुन्हे दाखल होणार. कर्जदारांशी दमदाटी करणे, वाहने ओढून नेणे किंवा घरात घुसून सक्तीने वसुली करण्यास सक्त मनाई. कर्जदारांशी नियमानुसार आणि सौजन्यानेच व्यवहार करणे बंधनकारक. कर्जमुक्तीतील ३७ हजार शेतकऱ्यांचा तिढा सुटणार; बँकांना कडक इशारा २ जून २०२६ रोजी जाहीर झालेल्या ऐतिहासिक कर्जमुक्ती योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील २ लाख ४ हजार ३६६ पात्र शेतकऱ्यांच्या याद्या जाहीर झाल्या आहेत. मात्र, अद्याप ३७ हजार ५८१ शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण प्रलंबित असल्याने त्यांचा लाभ अडकला आहे. अशा सर्व शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी आणि पुराव्यांसह तक्रार कक्षाकडे संपर्क साधून तत्काळ प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच, ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे, त्यांना तत्काळ नवीन पीक कर्ज देण्याचे स्पष्ट आदेश बँकांना देण्यात आले आहेत. जर कोणत्याही बँकेने कर्जवाटपात टाळाटाळ केली, तर त्या बँक व्यवस्थापनावर थेट कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा निर्वाणीचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

### शेतकऱ्यांनो, अन्याय सहन करू नका; पुराव्यांसह तक्रार करा- जिल्हाधिकारी

अवैध सावकारी, वित्तीय संस्थांकडून कथित दमदाटी, सक्तीची वसुली, कर्जमुक्ती योजनेतील अडथळे किंवा नवीन पीककर्ज नाकारण्यासंबंधी अडचणी असल्यास शेतकऱ्यांनी ९३०७३२५५८६ या व्हॉट्सप क्रमांकावर लेखी तक्रार आणि उपलब्ध पुरावे पाठवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आणि जिल्हा उपनिबंधक यांच्याकडून शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. तक्रारीसोबत संबंधित व्यक्ती किंवा संस्थेचे नाव, व्यवहाराचा तपशील, उपलब्ध कागदपत्रे आणि संपर्काची माहिती दिल्यास प्रकरणाची पडताळणी करण्यास मदत होऊ शकते.

### कर्जमाफी मिळाली, मग नवीन पीककर्जासाठी अडवणूक कशाला?

कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना पुढील हंगामासाठी पीककर्जाची गरज असते. अशा वेळी बँकांकडून नियमानुसार पात्रतेची पडताळणी करून कर्जप्रकरणे वेळेत निकाली काढणे आवश्यक आहे. पात्र शेतकऱ्यांच्या नवीन पीककर्जाच्या अर्जांवर विनाकारण टाळाटाळ होत असल्यास त्यांनी संबंधित तपशीलांसह तक्रार निवारण कक्षाकडे दाद मागावी. बँकांनी कर्जवाटप करताना लागू नियमांचे पालन करावे आणि पात्र अर्जदारांना अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी. कर्जवाटपात अनियमितता किंवा नियमभंग आढळल्यास संबंधित प्रकरणात नियमानुसार कारवाई होऊ शकते, असा प्रशासनाचा इशारा आहे.

### तक्रार निवारण कक्षाची जबाबदारी निश्चित..

या जिल्हास्तरीय कक्षाच्या प्रमुखपदी उपजिल्हाधिकारी सतीश सोनी यांची नियुक्ती करण्यात आली असून, सहायक निबंधक ऋषिकेश कातळे आणि सहायक लीड बँक व्यवस्थापक श्रीकांत लोखंडे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. या कक्षाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींची छाननी, संबंधित विभागांकडून आवश्यक माहिती मिळविणे आणि प्रकरणाच्या स्वरूपानुसार पुढील कार्यवाही करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### अवैध सावकारी करणाऱ्यांनो, कायद्याचा धाक ठेवा!

अवैध सावकारीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक संकटात ढकलले जात असल्याच्या तक्रारी गंभीर आहेत. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत लागू तरतुदींनुसार बेकायदेशीर सावकारीच्या प्रकरणांत कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे परवान्याशिवाय सावकारी करणे, नियमबाह्य व्यवहार करणे किंवा कर्जदारांवर बेकायदेशीर दबाव आणणे याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित प्रकरणाची चौकशी करून कायदेशीर पावले उचलण्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे.

## कसली सुरक्षा नसल्याचा आरोप नातेवाईकांनी मृतदेह कारखान्यासमोर ठेवला

### पवारवाडी येथील जय महेश कारखान्यात विजेच्या धक्क्याने एका तरुण कामगाराचा मृत्यू

**माजलगाव । शेख अखिल**

माजलगाव तालुक्यातील पवारवाडी येथील जय महेश कारखान्यावर विद्युत विभागात कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या लखन भागवत बादाडे वय २७ वर्ष या तरुण कामगाराचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची दुर्दैव घटना दिनांक २१ रोजी सायंकाळी चारच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे कारखाना परिसरात खळबळ उडाली असून कामगाराच्या सुरक्षेचा प्रश्न निरनिवर आला आहे. दरम्यान कामाच्या ठिकाणी पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसल्याचा आरोप करत मृत्यू कामगाराच्या नातेवाईकांनी कारखान्यावर क्रिया आंदोलन केले त्यानंतर संतप्त नातेवाईकांनी तरुण कामगाराचा मृत्यू देह कारखान्यासमोर आणून ठेवल्याने तणाव वाढला होता.

**सुरक्षेच्या प्रश्न एरणीवर दोषीवर कारवाईची मागणी**

लखनच्या मूर्तीची बातमी समजताच संत नातेवाईकांनी त्यांचा मृत्यू जय महेश कारखान्यावर आणला कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. संबंधित विभागातील जबाबदार अधिकाऱ्या आणि दोषीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी नातेवाईकांनी कारखाना परिसरात या मांडला कारखान्यात काम करणारा कंत्राटी कामगाराच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध होती का आणि या घटनेला जबाबदार कोण असे प्रश्न या घटनेनंतर उपस्थित झाले आहेत. विजेचा धक्का लागल्याने जागीच कोसळला लखन भागवत बादाडे हा राहणारा केसापुरी परिसरातील रहिवासी असून तो जय महेश कारखान्याच्या विभूत विभागात कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत होता बुधवारी सायंकाळी चारच्या दरम्यान काम करीत असताना त्याला विभूत वाहनेच्या वायर मधून विजेचा जोरदार धक्का लागला त्यामुळे तो खाली कोसळला त्याला तातडीने माजलगाव शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत्यू घोषित केले.



अवघ्या २७ वर्षाचा लखन चा अशा प्रकारे दुर्दैव अंत झाल्याने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक मित्रपरिवार आणि परीचिंतांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. तरुण कामगाराच्या मृत्यूमुळे माजलगाव परिसरात हा युक्त होत आहे. एका तरुण कामगाराच्या मृत्यू झाल्याने त्याच्या कुटुंबाचा आधार हरपला आहे. या दुर्घटनेची सखोल चौकशी करून नेमके कारणे शोधणे कामगाराच्या सुरक्षेतेबाबतच्या उपाय योजनेची तपासणी करणे आणि जोशी आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

## 'चमत्कार' दाखवतो म्हणून सोन्याची अंगठी लंपास करणाराला बेड्या

**बीड । प्रतिनिधी**

परळी बसस्थानकात चमत्कार दाखवून वृद्ध प्रवाशाची सोन्याची अंगठी लंपास करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील सराईत गुन्हेगाराला बीड स्थानिक गुन्हे शाखेने येवला येथून जेरबंद केले. अफजल नवाब मदारी (वय २५, रा. येवला, जि. नाशिक) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून १० ग्रॅम वजनाची, अंदाजे १ लाख ७ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी जप्त करण्यात आली.

२८ सप्टेंबर रोजी दुपारी परळी बसस्थानकात हेळंब येथील गणपत लक्ष्मण आंधळे या वृद्धाच्या हातात आरोपीने दगडाचा खडा देऊन त्याचा रुद्राक्ष बनवण्याचा बहाणा केला. याच संधीचा फायदा घेत त्याने आंधळे यांच्या हातातील सोन्याची अंगठी चोरून नेली. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच फिर्यादीकडून आरोपीच्या वर्णनाची माहिती घेऊन गोपनीय बातमीदारामार्फत तपास केला. त्यातून अफजल मदारी याचे नाव निष्पन्न झाले. पथकाने येवला येथे जाऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीची अंगठी जप्त करण्यात आली असून, पुढील तपास परळी शहर पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, पोलीस हवालदार सचिन सानप, पोलीस हवालदार गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, चालक पोलीस हवालदार अतुल हराळे आणि पोलीस अंमलदार विकी सुरवसे यांचा समावेश होता.

## कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी पाडसाला जीवदान!

### वनरक्षक महेश मेटे यांनी वनकर्मचारी पाठवून केली मदत; बालाघाट परिसरातील वन्यजीवांच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी शिवारात कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या एका पाडसाला जीवदान देण्यात यश आले. शेतकरी अंगद लक्ष्मण ढास यांनी जखमी अवस्थेत आढळलेल्या पाडसाला पाणी पाजून घरी आणले. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी वनविभागाशी संपर्क साधून पाडसाला मदत मिळवून दिली.



मुळुकवाडी शिवारातील अंगद लक्ष्मण ढास यांच्या मागिरा शिवारातील शेतात दि.२५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेले पाडस आढळून आले. पाडसाच्या डोक्याला जखमा झाल्याचे दिसून आले. ढास यांनी त्याला पाणी पाजून घरी आणत त्याची काळजी घेतली. दि.२६ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांना दूरध्वनीवरून या घटनेची माहिती दिली. त्यानंतर डॉ. ढवळे यांनी घटनास्थळी भेट देऊन जखमी पाडसाची पाहणी केली. त्यांनी वनरक्षक महेश मेटे यांच्याशी संपर्क साधून पाडसाचे फोटो व व्हिडिओ पाठवले आणि वनकर्मचारी तातडीने पाठविण्याची विनंती केली. या माहितीची दखल घेत वनरक्षक महेश मेटे यांनी वनकर्मचारी घटनास्थळी पाठवले. वनकर्मचाऱ्यांनी जखमी पाडसाला ताब्यात घेतले. त्यामुळे वेळेत मदत मिळाल्याने पाडसाच्या उपचारासाठी पुढील कार्यवाही करण्याचा मार्ग मोकळा झाला.

**पाण्याअभावी वन्यजीवांची भटकंती; पाणवठे भरण्याची मागणी**

बालाघाट परिसरात पावसाअभावी तलाव आणि जलस्रोत आटल्याने वन्यजीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाण्याच्या शोधात वन्यजीव मानवी वस्त्यांकडे वळत असून, अशा वेळी कुत्र्यांच्या हल्ल्यांत वन्यप्राणी जखमी होण्याच्या घटना घडत आहेत. तसेच राष्ट्रीय महामार्गांवर वाहनांच्या धडकेत वन्यजीवांचा मृत्यू होण्याच्या घटनाही चिंताजनक आहेत. वन्यजीवांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे आणि त्यांचे जीव वाचावेत, यासाठी वनविभागाने जंगल परिसरातील नैसर्गिक व कृत्रिम पाणवठ्यांमध्ये नियमित पाणीपुरवठा करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## ३० किलोचा आठ फूट अजगर विहिरी बाहेर काढत सर्पमित्राने दिले जीवदान!

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नाळवंडी येथे विहिरीत पडलेल्या भल्या मोठ्या अजगराला सर्पमित्र दीपक वाघमारे यांनी जीवाची बाजी लावत सुरक्षित बाहेर काढले. सुमारे ३० किलो वजनाच्या या अजगराला वनविभागाच्या मोकळ्या जागेत सोडून जीवदान देण्यात आले. मात्र, शेकडो विषारी व बिनविषारी सापांना जीवदान देणाऱ्या सर्पमित्रांना वनविभागाने मानधन आणि आवश्यक साहित्य द्यावे, अशी मागणी पुढे येत आहे.



शुक्रवारी (दि. २३ ऑक्टोबर) दुपारी दोनच्या सुमारास नाळवंडी गावातील विहिरीत मोठा अजगर पडल्याची माहिती दीपक वाघमारे यांना मिळाली. त्यांनी जयदीप ओव्हाळ व विशाल मिसळे यांच्यासह घटनास्थळी धाव घेतली. विहीर सुमारे २५ ते ३० फूट खोल असून, खाली उतरण्यासाठी पायऱ्या नव्हत्या. अशा परिस्थितीत दोरीच्या साहाय्याने विहिरीत उतरून दीपक वाघमारे यांनी अजगराला पोत्यात सुरक्षित पकडले आणि बाहेर काढले. गावकऱ्यांनीही एवढा मोठा अजगर प्रथमच पाहिल्याचे सांगितले. अजगर बिनविषारी असून पर्यावरणातील अन्नसाखळीत त्याचे महत्त्वाचे स्थान आहे. रात्री या अजगराला वनविभागाच्या मोकळ्या जागेत सुरक्षित सोडण्यात आले.

**सर्पमित्रांना केवळ कौतुक नको, सरकारी मदतही हवी!**

दिपक वाघमारे यांनी आतापर्यंत शेकडो विषारी व बिनविषारी सापांना पकडून सुरक्षित नैसर्गिक अधिवासात सोडले आहे. साप पकडताना सर्पमित्र स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करतात. मात्र, अशा कार्यासाठी त्यांना पुरेसे मानधन, संरक्षण साहित्य आणि आवश्यक उपकरणे मिळतात का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. वनविभागाने सर्पमित्रांची अधिकृत नोंदणी करून त्यांना लेखी मानधन, सुरक्षा साधने आणि सर्पमुक्तीच्या कामासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे. सर्पमित्र दिपक वाघमारे यांचे आवाहन :साप दिसला म्हणून घाबरू नका,त्याला मारू नका कारण सर्वच साप हें विषारी नसतात, स्वतः पकडण्याचा प्रयत्नही करू नका. सर्पमित्रांना कळवा; सापाला सुरक्षितपणे पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येईल.

## कारचा दरवाजा उघडून ६.५५ लाखांचा ऐवज लंपास!

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासह जिल्ह्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे.एकट्या मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावणे, व्यापाऱ्यांच्या बॅगा लंपास करणे, अशा घटनांनंतर आता कारमधून लाखोंचा ऐवज चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी बीडच्या जुन्या मोंढा परिसरात व्यापाऱ्याची सुमारे अडीच लाखांची बॅग चोरीला गेल्याची घटना ताजी असतानाच धुळे-सोलापूर महामार्गावर चोरट्यांनी हात साफ केला.

बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहेर वडगाव फाटा परिसरात २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी कारचा दरवाजा उघडून पर्समधील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रूपसिंह कांता इंदापुर (वय ४९, व्यवसाय शेती, रा. आनंदनगर, धाराशिव) हे देवदर्शनासाठी नाशिककडे जात होते. दरम्यान, आहेर वडगाव फाट्याजवळील तुळजाई रसवंतीगृहासमोर त्यांनी कार रस्त्याच्या बाजूला उभी केली आणि रस पिण्यासाठी गेले. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी कारचा दरवाजा उघडून आतील पर्स चोरून नेली.

## धारूरच्या कब्रस्तानातील कब्री तोडून प्लॉटिंगचा प्रयत्न?

### काजी समाजाच्या वडिलोपार्जित कब्रस्तानातील कब्रींची तोडफोड; कारवाई न झाल्यास रक्तपात होण्याची शक्यता, तक्रारदारांचा गंभीर इशारा

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील मौजे धारूर येथील सर्वे नं. ६१५, नामे तलवडी परिसरातील मुस्लिम काजी समाजाच्या वडिलोपार्जित कब्रस्तानातील जुन्या कब्री (समाध्या) अनधिकृतपणे तोडण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. कब्री तोडून त्या ठिकाणी प्लॉटिंग करण्याचा प्रयत्न तसेच मुरूमाची साठवणूक होत असल्याबाबत जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणात जिलानीबेगम भ्र. अल्ताफ मोहियोद्दीन काझी, हक्कानीबेगम भ्र. इफ्तेखार फारोखी, हाजराबेगम (गोरीबेगम) पि. असहाबोद्दीन काझी आणि मुस्ताहसीन पि. अल्ताफ मोहियोद्दीन काझी यांनी संयुक्त तक्रार दिली आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित कब्रस्तान आणि समाध्या दीडशे वर्षांपासून अस्तित्वात असून महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात त्याची नोंद आहे. काजी समाजाच्या पूर्वजांच्या कब्री तोडल्याचा आरोप तक्रारीनुसार, संजीत जगन्नाथ कोमटवार, त्यांचे पुत्र साईनाथ कोमटवार, मयत भाऊ रमेश रघुनाथ कोमटवार यांचे पुत्र रोशन कोमटवार व रोहित कोमटवार तसेच कुटुंबातील इतर सदस्यांनी कब्रस्तानातील कब्री तोडल्याचा आरोप आहे. कब्रस्तानाच्या शेजारील जुनी विहीर मुरूम टाकून बुजविण्यात आली असून, संबंधित जागेवर प्लॉटिंग करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. कारवाई न झाल्यास रक्तपात होण्याची शक्यता; शासनाला जबाबदार धरण्याचा इशारा काजी समाजाच्या वडिलोपार्जित कब्रस्तानातील



पूर्वजांच्या कब्रींची तोडफोड झाल्यामुळे समाजात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. संबंधित कब्री तोडणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करून कब्रस्तानाचे संरक्षण करावे, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे. प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप केला नाही, तर भविष्यात या प्रकरणातून रक्तपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा गंभीर इशारा देण्यात आला आहे. संभाव्य गंभीर परिस्थिती उद्भवल्यास त्याची जबाबदारी शासन व संबंधित प्रशासनावर राहील, असेही तक्रारदारांनी निवेदनात म्हटले आहे. जमिनीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना काम सुरू असल्याचा दावा सर्वे नं. ६१५ या वादग्रस्त जमिनीबाबत धारूर दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा क्र. ४/२०१३ व ७८/२०१५ तसेच जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, केज येथे किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १०/२०२५ न्यायप्रविष्ट असल्याचे तक्रारदारांनी नमूद केले आहे. न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असताना कब्री तोडणे, मुरूम टाकणे व प्लॉटिंग करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांकडे पंचनाम्याची मागणी जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून तोडलेल्या कब्रींचा पंचनामा करावा, संबंधित जागेची वस्तुस्थिती तपासावी आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे. या तक्रारीच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय अधिकारी माजलगाव, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ छत्रपती संभाजीनगर, तहसीलदार धारूर, पोलीस निरीक्षक धारूर आणि मुख्याधिकारी नगर परिषद किल्ले धारूर यांना सादर करण्यात आल्या आहेत. धारूरमधील या प्रकरणामुळे वडिलोपार्जित कब्रस्तानाच्या संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासन या गंभीर तक्रारीवर काय कारवाई करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सम्पादकीय

# जलविद्युत निर्मितीत घट

यंदा औष्णिक ऊर्जा उत्पादनात १० टक्के आणि अणुऊर्जेत १८ टक्क्यांची वाढ झाली; परंतु जलविद्युत निर्मितीतील घट ही चिंतेची बाब आहे. एल निनोच्या प्रभावामुळे भारतात पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे आणि तीव्र दुष्काळ जाणवतो आहे. त्याचा फटका अन्नधान्याच्या उत्पादनाला बसला असून, प्रचंड भाववाढ झाली आहे. पुढील जूनपर्यंत पाण्याची गरज कशी भागवायची, हा खरा प्रश्न आहे. मुंबईसारख्या शहरात तुलनेने मुबलक पाणीसाठा असला, तरीदेखील तीव्र उन्हाळ्यामुळे बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे हे साठे झपाट्याने घटत आहेत. औष्णिक आणि अणुऊर्जा तसेच नवीकरणीय ऊर्जा हे पर्याय उपलब्ध असले, तरीदेखील जलविद्युत निर्मितीचे प्रमाणही लक्षणीय असते. परंतु आता पाणीसंकटामुळे या प्रकल्पांवर गदा आली आहे. देशात एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या सहा महिन्यांत वीजनिर्मितीचे उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण झाले. परंतु जलविद्युत निर्मितीत १२ टक्क्यांची घट झाली आहे. औष्णिक आणि अणुऊर्जा निर्मितीतील वाढीमुळे एकूण वीजनिर्मिती समाधानकारक असल्याचे केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या अहवालात म्हटले आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या काळात भारतात ८५ कोटी मेगावॅट तास वीजनिर्मिती झाली. निर्धारित उद्दिष्टापेक्षा ती अधिक झाली. गतवर्षीच्या याच कालावधीत ७९ कोटी मेगावॅट तास वीजनिर्मिती झाली होती. म्हणजे त्या तुलनेत यंदा सात टक्क्यांची वाढ झाली. केवळ सप्टेंबर महिन्यातच देशात १४ कोटी मेगावॅट तास वीजनिर्मिती झाली. अखंडित वीजपुरवठा ही उद्योगक्षेत्राचीच नव्हे, तर कृषिक्षेत्राचीही मूलभूत गरज असते. परंतु दावे कितीही केले जात असले, तरी अगदी पुणे किंवा पिंपरी–चिंचवड भागातही अनेकदा वीज खंडित होत असल्याचा अनुभव आहे. वीजनिर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करताना, वेगवेगळ्या ऊर्जास्त्रोतांमधील समतोल राखणे आणि उपलब्ध प्रकल्पांचा कार्यक्षम वापर होणे आवश्यक आहे. भारतात परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात येत असून, त्यात डेटा सेंटर प्रकल्पांचा समावेश आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात ऊर्जा व पाणी लागते. पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना, डेटा सेंटरच्या गरजा भागवता येणे कठीण होणार आहे. जागतिक संघर्षामुळे निर्माण झालेल्या अन्न, इंधन आणि पर्यावरणाच्या समस्यांचा सर्वाधिक विपरीत परिणाम ग्लोबल साउथमधील देशांवर होत आहे आणि या आव्हानांचा सामना करण्यावर जी–२०ने लक्ष्य केंद्रित करावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्राझिलमधील रिओ द जानेरो येथील जी–२०च्या शिखर परिषदेत बोलताना दोन वर्षांपूर्वी केले होते. भारताने सौर ऊर्जा व नवीकरणीय ऊर्जेवर भर दिला असून, त्यासाठी अनेक आर्थिक प्रोत्साहने दिली आहेत. परंतु तरीदेखील राज्यांच्या पातळीवर पुरेसे प्रयत्न होत असल्याचे दिसत नाही. भारतीय नवीकरणीय ऊर्जा उद्योगात प्रचंड विदेशी भांडवल येऊ लागले आहे. याचे कारण, विदेशी भांडवलदारांना अन्य देशांत पुरेशा संधी मिळाल्या नाहीत. विदेशी पेन्शन फंड, सॉव्हरिन हेल्थ फंड आणि प्रायव्हेट इक्विटी फंड यामधून १० अब्ज डॉलर्सचे विदेशी भांडवल येत आहे. जागतिक सरासरीपेक्षा भारतातला विकासदर अधिक असेल, असा या गुंतवणूकदारांचा अंदाज आहे. त्यामुळे विजेची व विशेषतः नवीकरणीय विजेची मागणी वाढेल, असे या गुंतवणूकदारांना वाटते. प्रगत देशांत गुंतवणुकीवर जेवढा रिटर्न मिळतो, त्यापेक्षा खूपच जास्त, म्हणजे डॉलरच्या हिशेबात ७ ते १० टक्के आणि रुपयाच्या हिशेबात १२ ते १५ टक्के रिटर्न भारतात मिळतो. भारतातील पायाभूत क्षेत्राचा विचार केला, तर नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प, ट्रान्समिशन लाइन्स आणि टोलचे रस्ते या क्षेत्रांत उत्पन्न चांगले मिळत आहे. सरकारची धोरणेही स्थिर आहेत. याउलट औष्णिक ऊर्जा, कचरा व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, वीज वितरण या क्षेत्रांमध्ये अधिक सुधारणा होण्याची गरज आहे. त्या झाल्या, तर या क्षेत्रांतही विदेशी गुंतवणूक आकर्षित करून घेता येईल. सौर व नवीकरणीय ऊर्जेच्या संदर्भात भारतात काही विसंगतीही आढळतात. आपण ८० टक्के सौर सामग्री ही चीनकडून खरेदी करतो. राष्ट्रवादाच्या कितीही वल्गना केल्या, तरी हे वास्तव नाकारता येणार नाही. किंवा नुसतेच स्वदेशीचे भजन गाऊन उपयोगाचे नाही. आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने ठोस पावलेही पडली पाहिजेत. सौर ऊर्जाक्षेत्र एकीकडे आर्थिकदृष्ट्या ताणाखाली असतानाच, परदेशातील खासगी इक्विटी फंडांकडून येणारी आवक मात्र सुरूच आहे. भारताने सौर व पवन ऊर्जानिर्मितीवर भर दिला असून, विजेवर चालणार्या मोटारींच्या उत्पादनावर लक्ष्य केंद्रित केले आहे. गेल्या काही वर्षांत नवीकरणीय ऊर्जेस प्रोत्साहन देण्यात आले. २०२२–२३चा केंद्रीय अर्थसंकल्प हवामानबदलाचे नवे पर्व आणणारा आहे. त्या अंतर्गत, सेंद्रिय शेती, शेतकर्यांसाठी खासगी वनशेती आणि ग्रो फॉरेस्ट्रीसाठी शेतकर्यांना नवी प्रोत्साहने देण्यात आली आहेत. हवामानबदलाच्या जागतिक आव्हानाला तोंड देण्यासाठी वनशेती उपकारक ठरते. पिकापासून ताटातल्या घासापर्यंत सगळ्या गोष्टींचा विचार केला, तर कार्बनच्या जागतिक उत्सर्जनात शेतीचा वाटा एकतृतीयांश आहे. रासायनिक शेती आणि एकावेळी एकच पीक घेणे यामुळे जमिनीची धूप होते. वनशेतीत खतांसारख्या आदानांचा वापर कमी होतो. उलट नैसर्गिक पिके आणि पद्धतींमुळे जमीन अधिक सुपीक बनते. हरित अर्थव्यवस्था तयार करण्यासाठी या क्षेत्रात कुशल मनुष्यबळ निर्माण केले पाहिजे. तसेच शेतीमधील प्रदूषण थांबवण्याकरिता प्रयत्न झाले पहिजेत. केंद्र आणि राज्यांनी मिळून ठोस संयुक्त प्रयत्न केले, तरच हरित ऊर्जेची लक्ष्ये गाठता येतील. मात्र याखेरीज जलविद्युत प्रकल्पांची कार्यक्षमता कशी वाढवता येईल, याचाही विचार झाला पाहिजे.

# जरांगे पाटील आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात षड्यंत्र रचणाऱ्यांची चौकशी करा!

## लिंबागणेश येथे मराठा सेवकांची निदर्शने; ऑडिओ क्लिपमधील दाव्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करा : डॉ.ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाला बदनाम करून मराठा समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याच्या निषेधार्थ मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज दि.२३ शुक्रवार रोजी सकाळी मराठा सेवकांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावांचा वापर करून आंदोलनाबाबत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून



दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली.

मनोज जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांसमोर ऑडिओ क्लिपचा संदर्भ देत मराठा आरक्षण आंदोलनाला बदनाम करण्यासाठी काही व्यक्तींना हाताशी धरून आर्थिक पाठबळ, मोर्चे आणि वाहनांची व्यवस्था करण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप केल्याचे डॉ. ढवळे यांनी नमूद केले. या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी संबंधित ऑडिओ क्लिपची तांत्रिक तपासणी करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या समाजातील गरजवंत कुटुंबांच्या मुलांना न्याय मिळावा, ही समाजाची अपेक्षा आहे. अशा परिस्थितीत आंदोलनाला बदनाम करण्याचा किंवा समाजात परस्परांविषयी अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्यास तो गंभीर विषय आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय किंवा सामाजिक व्यक्तीचे नाव पुढे करून आरोप–प्रत्यारोप करण्याऐवजी उपलब्ध पुराव्यांची तपासणी करून सत्य जनतेसमोर आणावे, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले.

या प्रकरणाच्या निषेधार्थ निदर्शने करत घोषणाबाजी करण्यात आली. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. जिल्हाधिकारी, बीडचे पोलीस अधीक्षक आणि नेकनूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्यामार्फत हे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले.

**निदर्शनांमध्ये यांचा सहभाग**

या आंदोलनात मराठा सेवक सरपंच बालासाहेब जाधव, ड. गणेश वाणी, दामोदर थोरात, विक्रांत वाणी, महावीर जाधव, अशोकराजे वाणी, प्रकाश वायभट, शहाजी वाणी, दादा गायकवाड, विनायक वाणी, नितीन जाधव, रेवण मोरे, अंगद येडे, अर्जुन घोलप, साहेबराव ढवळे, संजय पावले, कृष्णा वायभट, दामोदर खिलारे, लखन जरे, बन्सी जाधव, महादेव वाणी, बंडु बागल, संजय सुकाळे, महेश ढास, सूरज ढास आदी सहभागी झाले होते.

# रेल्वे स्थानकासाठी नागरिकांसह बीड शहरातील रस्त्यांनाही शहर वाहतूक बसची प्रतीक्षा

**रेल्वेचे बारसे झाल्याने एस.एम.युसूफ, रमेश गंगाधरे यांनी पुन्हा वेधले लक्ष**

**बीड । प्रतिनिधी**

रेल्वे स्थानकासाठी नागरिकांसह बीड शहरातील रस्त्यांनाही शहर वाहतूक बसची प्रतीक्षा असल्याचे मत मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून मांडले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, १७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून बीड–पुणे रेल्वे सेवेचे उद्घाटन मोठ्या थाटात पार पडले. त्याला आता २६ ऑक्टोबर २०२६ रोजी पूर्ण ४० दिवस झाले. अर्थातच या रेल्वेचे बारसे झाले आहे. तरीसुद्धा रेल्वे स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी शहर वाहतूक बस सेवा नसल्याने प्रवाशांना जमेल त्याप्रमाणे रेल्वे स्थानक गाठण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. विशेष म्हणजे या रेल्वेला प्रवाशांचा भरभरून प्रतिसाद मिळाल्याने या मार्गावर रेल्वे यशस्वी झाली आहे.




आता रेल्वे स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रवाशांना शासकीय तंत्रनिकेतन (गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक) पासून नाळवंडी नाका–तेलगाव नाका–बार्शी नाका–शिवाजीनगर पोलीस ठाणे चौक–पंचशील नगर–पालवन चौक मार्गे रेल्वे स्थानक. २) एमआयडीसी एरिया पासून रामतीर्थ–मन्सूर शाह दरगाह–नवा मोंढा रोड–जालना रोड–एस.टी.स्टँड–छत्रपती शिवाजी महाराज चौक–जुना नगर नाका–यशवंतराव चव्हाण नाट्यगृह–तुळजाई चौक–आशा टॉकीज चौक–धानोरा रोड–पालवन चौक मार्गे रेल्वे स्थानक. ३) आनंदवाडी पासून जालना रोड–एस.टी.स्टँड–छत्रपती शिवाजी महाराज चौक–धानोरा रोड–पालवन चौक मार्गे रेल्वे स्थानक. ४) करपरा नदीपासून पांगरी रोड–अंबिका चौक–राजीव गांधी चौक–जुना नगर नाका–यशवंतराव चव्हाण नाट्यगृह–पंचशील नगर रोड–पालवन चौक मार्गे रेल्वे स्थानक. ५) चऱ्हाटा फाटा चौक पासून बालेपीर–पोलीस मुख्यालय–धानोरा रोड–पालवन चौक मार्गे रेल्वे स्थानक. ६) शहिंशाह वली दरगाह पासून कंकालेश्वर मंदिर चौक–मोमीनपुरा बायपास रोड–बार्शी नाका–शिवाजीनगर पोलीस ठाणे चौक–पंचशील नगर रोड–पालवन चौक ते रेल्वे स्थानक व तेथून परत या सहा मार्गावरून शहर वाहतूक बस सुरू होण्याची प्रतीक्षा नागरिकांसह या रस्त्यांनाही असल्याचे मत एस.एम.युसूफ आणि रमेशराव गंगाधरे यांनी व्यक्त केले आहे.



लिंबागणेश येथील तुळजाभवानी केसरी बैलगाडी शर्यतीचा निकाल प्रथम क्रमांक ५१००० रुपये बक्षीस बीड जिल्ह्यातील अमोल बहिरवाळ मांडवजाळी (रूद्रा), युवराज पवार वडीगोद्री (सम्राट), द्वितीय क्रमांक ३१००० रुपये बक्षीस बीड जिल्ह्यातील संजय राठोड भिदवण तांडा (कृष्णा), दादा चव्हाण जांभळी तांडा (रायफल), तृतीय क्रमांक बक्षीस २१००० रुपये बीड जिल्ह्यातील प्रविण मुंडे भवानवाडी (सर्कीट), देविदास कुटेकर माळेगांव (सुंदर), चतुर्थ क्रमांक १५००० रुपये जालना जिल्ह्यातील रवी नरवडे गोंदी (हिंदकेसरी पवन), ब्रम्हा मगरे (कल्की) पाचवे बक्षीस ११००० रुपये अहिल्यानगर जिल्ह्यातील पैलवान विशाल बोबडे (शॉट गन बंट्या डॉन), स्व.शुभम दादुस घोडके (कारतुस ०२०२) रोख रक्कम समवेत ढाल संयोजक महेश ढवळे, सुरज ढवळे, सुरेश ढवळे, धनंजय मुळे, शहादेव धलपे, हरिओम क्षीरसागर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

# जय भवानी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनावर कार्यशाळा संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील मराठी विभागाच्या वतीने 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम व प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. शिवाजीराव काकडे होते, तर साधन व्यक्ती म्हणून मदत व पुनर्वसन विभाग शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रशिक्षक श्री. सिद्धेश्वर लटके हे उपस्थित होते. प्रमुख वक्ते श्री. सिद्धेश्वर लटके यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व विशद करताना नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचे स्वरूप, आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळात घ्यावयाची खबरदारी आणि आपत्तीनंतर करावयाच्या उपाययोजना यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. भूकंप, पूर, आग, वादळ यांसारख्या आपत्तींच्या वेळी घाबरून न जाता प्रसंगावधान राखणे, सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे आणि योग्य वेळी मदतकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आपत्ती व्यवस्थापन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगून पुढे ते म्हणाले की, आपत्तीच्या प्रसंगी योग्य निर्णय घेणे, अफवांवर विश्वास न ठेवणे, बचावकार्य करणाऱ्या यंत्रणांना सहकार्य करणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळाल्यास संकटाच्या वेळी ते स्वतःच्या तसेच इतरांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात, असे प्रतिपादनही त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्रा. डॉ. शिवाजीराव काकडे यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले. आपत्तीच्या काळात संयम, सजगता, तत्परता आणि सामूहिक सहकार्य या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यशाळेच्या प्रारंभी प्रा. बापू घोक्षे यांनी प्रास्ताविक करून कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.व्यासीठावर लोप्रशासन विभागाच्या प्रमुख तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट ) सदस्या प्रा.डॉ. कल्पना घारगे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगडे यांनी केले, तर प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी उपस्थित मान्यवर, प्रमुख वक्ते, अध्यक्ष आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. व मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम व प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेमुळे आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी ज्ञान देणारी आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढवणारी ही कार्यशाळा उपयुक्त ठरली असल्याचे उद्गार उपस्थित मान्यवरांनी काढले.

# राणेचा नवा फतवा! दिवाळी खरेदी हिंदू दुकानदाराकडूनच करा : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

मंत्री नितेश राणे यांनी दिवाळीच्या तोंडावर नवा फतवा काढला आहे. दिवाळीत हिंदूचीच दुकान लागली पाहिजेत, हिंदू कडूनच वस्तू खरेदी करा. असं वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केला आहे. या वक्तव्यामुळे राज्यभरात वाद निर्माण झाला असून, सामान्य नागरिक आणि दुकानदारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. राणे म्हणतात, दिवाळी हिंदूंनी हिंदूंच्या दुकानातून खरेदी करावी. पण प्रश्न असा आहे की, दुकानदार हा आधी भारतीय नागरिक आहे. मग तो हिंदू असो वा मुस्लिम. व्यवसायात धर्म आणून तुम्ही महाराष्ट्राची गंगा जमुना संस्कृती तोडण्याचा प्रयत्न करतात का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ता तथा स्वतंत्र पत्रकार शेख युनूस यांनी कडाडून टीका केली आहे. ते म्हणाले राणे साहेब फतवा काढणं सोपं आहे, पण गरीब हिंदू कुटुंबाला दिवाळीत मुलासाठी फटाके, कपडे, फराळ हा घ्यायचा आहे. महागाईने कंबरट मोडल आहे. पण गरीब हिंदू कुटुंबातील मुलासाठी फटाके, कपडे, फराळ घ्यायचा आहे. बेरोजगारी वाढलेली आहे अशा परिस्थितीत तुम्ही खरेदीवर धर्माचे बंधन लादताय. जर तुम्हाला हिंदूंनी फक्त तुमच्या सांगितलेल्या दुकानदारा कडूनच खरेदी करायची असेल, तर त्या खरेदीसाठी पैसे तुम्ही देणार का? प्रत्येक हिंदू च्या खात्यात २५ ते३० हजार रुपये टाका, मग तो तुमच्या सांगण्याप्रमाणे वागेल, शेख युनूस यांनी मागणी केली आहे की, नितेश राणे यांनी आपले वादग्रस्त वक्तव्य मागे घ्यावं आणि सर्व धर्मातील दुकानदारांना समान संधी देण्याची भूमिका घ्यावी. जर खरंच हिंदूच्या हिताची काळजी असेल , तर महागाई कमी करा, रोजगार द्या, शेतकऱ्यांना मदत करा. फतवे काढून समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करू नका. हीच अपेक्षा हिंदू बांधवांची पण आहे. समासदिच्या जातीय तेढ निर्माण करण्याचे काम करू नये.

# दुष्काळाच्या विळख्यात बीड जिल्हा; शेतमजूर, ऊसतोड कामगार आणि एकल महिलांच्या मदतीसाठी 'आझाद क्रांती कामगार युनियन' आक्रमक

**गेवराई शहरासह जिल्ह्यातील ११ तालुक्यांत परिस्थिती बिकट; तातडीने उपाययोजना करण्याची निवेदनाद्वारे मागणी**

**गेवराई । प्रतिनिधी**

खरीप २०२६ च्या हंगामात बीड जिल्ह्यात पावसाने दिलेल्या ओढ मुळे अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्य शासनाने जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये ' लागू करून दुष्काळ जाहीर केला असला, तरी अद्याप तळागाळातील असंघटित कामगार, शेतमजूर, बांधकाम कामगार आणि ऊसतोड कामगारांपर्यंत कोणतीही ठोस मदत पोहोचलेली नाही. या पार्श्वभूमीवर, 'आझाद क्रांती कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य' च्या वतीने प्रशासनाला निवेदन देऊन तातडीने मदत कार्य सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. पावसाच्या मोठ्या तूटीमुळे कापूस, सोयाबीन, तूर आदी खरीप पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. परिणामी, शेतीवर अवलंबून असलेल्या भूमिहीन शेतमजूर आणि असंघटित



क्षेत्रातील कामगारांचा हक्काचा रोजगार हिरावला गेला आहे.

वस्त्यांमध्ये उपासमार आणि कर्जाचा डोंगर आझाद क्रांती कामगार युनियनच्या प्रतिनिधींनी गेवराई शहरातील भटके विमुक्त, आदिवासी, दलित, अल्पसंख्याक आणि भूमिहीन कामगारांच्या वस्त्यांना भेटी दिल्या. या दौऱ्यात अन्नसुरक्षा, पिण्याचे पाणी, रोजगार, आरोग्य आणि मुलांचे शिक्षण यांसारख्या अत्यंत मूलभूत आणि गंभीर अडचणी समोर आल्या आहेत. रोजगार नसल्यामुळे या कुटुंबांवर हंगामी स्थलांतराची वेळ आली असून, बालकामगारांचा धोका आणि महिलांच्या शोषणाची शक्यता वाढली आहे. त्यातच मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या कर्जाचा ताण असह्य झाल्याने विशेषतः एकल व गरीब महिलांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे.

युनियनने निवेदनात मांडलेल्या ५ प्रमुख मागण्या : अन्नसुरक्षा किट्चे वाटप: हतबल झालेल्या शेतमजूर, बांधकाम कामगार, ऊसतोड कामगार, भटके विमुक्त, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, एकल महिला आणि भूमिहीन कुटुंबांना ज्वारी, गहू, डाळी, तेल, मसाले व पोषक आहाराचा समावेश असलेले रेशन किट तातडीने मोफत द्यावे. अन्नछत्र सुरू करा: कामगारांच्या वस्त्या, खेडी गावे आणि शहरातील निर्वासित/स्थलांतरित कुटुंबांच्या वस्त्यांमध्ये उपासमार व कुपोषण टाळण्यासाठी शासनाने तात्काळ अन्नछत्र (कम्युनिटी किचन) सुरू करावे. तात्काळ रोजगार उपलब्ध करा: रोजगार हमी योजनेंतर्गत (रोहयो) कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक कामगाराला १५ दिवसांच्या आत काम द्यावे. यासाठी तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, जलसंधारण, वृक्षारोपण, रस्ते दुरुस्ती यांसारख्या सार्वजनिक कामांचे नियोजन करावे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था: सर्व खेडी आणि शहरातील कामगार वस्त्यांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची निश्चित व्यवस्था करावी. पाणी टंचाई असलेल्या वस्त्यांना नियमित टँकरपुरवठा, पाण्याचे टाके व आवश्यक असल्यास बोरवेल/पाणीपुरवठा योजना उपलब्ध कराव्या. मोफत आरोग्य सेवा: दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या आजारांचा मुकाबला करण्यासाठी लहान मुले, महिला, वृद्ध आणि आजारी व्यक्तींसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, रुग्णवाहिका सेवा, आवश्यक औषधे व उपचार मोफत उपलब्ध करून द्यावेत.

# ऊसतोडणी दर वाढीचा करार त्वरित करण्यात यावा; कामगार युनियनचा एल्गार

**दरवाढीसह ९ मागण्यासाठी शासनाला निवेदन**

**बीड । प्रतिनिधी**

यंदा पावसाने पूर्णपणे दडी दिल्याने निर्माण झालेली दुष्काळ सदृश्य परिस्थिती आणि हाती न आलेले खरीप पिक यामुळे बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारावर ऐन दिवाळीत घराऐवजी उसाच्या फडात सण साजरा करण्याची वेळ आली आहे. दसरा होताच पोटाची खळगी भरण्यासाठी मजुरांचे तांडे आपल्या जनावर व चिमुकल्यासह साखर कारखान्याच्या दिशेने लाखोच्या संख्येने जिल्हा बाहेर तसेच परराज्यात मार्गस्थ होऊ लागले आहेत. महाराष्ट्र राज्य ऊसतोड वाहतूक, मुकादम, कामगार युनियनच्या वतीने दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी ऊस तोडणी कामगार व ऊस वाहतूक दरामध्ये ८०% दरवाढ करण्यात यावी अशी मागणी शासनाकडे केली होती.

राज्यातील इतर ऊसतोड कामगार संघटनेने देखील ऊस तोडणी दर ८०% ते १००% दरम्यान दरवाढ करण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करून शासनाकडे मागणी केलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत शासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नसून. ऊस तोडणी दरवाढीचा त्रिपक्षीय करार यंदा तीन वर्षानंतर संपुष्टात आला असून नवीन ऊस तोडणी व वाहतूक दरवाढीचा करार त्वरित लवादाची त्रिपक्षीय बैठक घेऊन ऊसतोडनी व वाहतूक दर जाहीर करण्यात यावा अशी प्रमुख मागणी महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार युनियनच्या वतीने राज्य उपाध्यक्ष डॉ. संजय तांदळे, शिव शाहू ऊसतोड कामगार संघटनेचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मोरे, डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष आरती परळकर, बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये यांनी दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी




कार्यालय मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साखर संघाचे अध्यक्ष खासदार शरद पवार साहेब, ऊसतोड कामगारांच्या नेत्या तथा पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे तसेच सहकार, कामगार, सामाजिक न्याय मंत्री व साखर आयुक्त पुणे यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात करण्यात यावी, स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या अध्यक्षांची निवड करण्यात यावी, ऊसतोड कामगारांच्या अपघातींना १० लाख रुपयांची मदत देण्यात यावी, ऊस तोडणी कामगार व ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रक, ट्रॅक्टर, टायर बैलगाडी वाहतूक दरांना ८० % टक्क्यांची दरवाढ करण्यात यावी, हमाल, माथाडी, कामगारांप्रमाणे ऊस तोडणी मजुरांना कामगाराचा दर्जा देण्यात यावा, त्यांची नोंद शासकीय कामगार कार्यालयात करण्यात यावी, ऊसतोड कामगारांना कारखान्याच्या परिसरात, फडात किंवा साइटवर निवारा, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृह, लाईट, आरोग्याची सुविधा देण्यात यावी, आरोग्य सेवा अंतर्गत पॅथॉलॉजी लॅबसह मोबाईल हॉस्पिटलची व म्बुलन्सची सोय प्रत्येक कारखान्यावर करण्यात यावी तसेच कारखान्याच्या परिसरात ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळेची सोय करण्यात यावी, हार्वेस्टर प्रमाणे ऊसतोड कामगारांना मजुरी देण्यात यावी, ऊस तोडणी कामगारांची दरवाढ महागाई निर्देशांकानुसार तथा बाजारभावाप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या महागाई भत्त्या प्रमाणे दरवर्षी वाहतूक व मजुरीत दरवाढ करण्यात यावी, स्थलांतरित ऊस तोडणी कामगार व स्थानिक ऊस तोडणी कामगार यांची नोंदणी साखर कारखान्यावर करून त्यांना ओळखपत्रे देण्यात यावेत. आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर, शिवशाहू ऊसतोड कामगार संघटनेचे राज्यसंघटक पांडुरंग आंधळे,अखिल भारतीय किसान सभाचे जिल्हाध्यक्ष कॉ. प्राचार्य डी.जी. तांदळे, शेतकरी हक्क मोर्चाचे अध्यक्ष राजेंद्र आमटे, इंटक कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, ऊसतोड कामगार कृती समितीचे जिल्हाध्यक्ष मोहन जाधव, निमंत्रक बाजीराव ढाकणे,विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज संघटनेच्या जिल्हाध्यक्ष किष्किंधा पांचाळ, माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनूस, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक खेडे, शहराध्यक्ष सादेक सय्यद आदींची उपस्थिती होती.

# आमदार प्रकाश सोळंके यांच्या नावावर बट्टा लावण्याचे काम 'साबिर कन्स्ट्रक्शन' व न.प. अभियंत्याकडून; माजलगाव पेव्हर ब्लॉक कामात मोठा भ्रष्टाचार! : नवीदुद्दीन सिद्दिकी

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव नगरपरिषद अंतर्गत वॉर्ड क्रमांक ८ मध्ये आमदार निधी (डी.पी.डी.सी. २०२४-२५) मधून सुरू असलेल्या पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामात प्रचंड भ्रष्टाचार आणि निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा खळबळजनक आरोप समाजवादी पार्टी व महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेना संघटनेचे नेते नवीदुद्दीन सिद्दिकी यांनी केला आहे. विशेष म्हणजे, लोकनेते आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी शहराच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला, मात्र त्यांच्या या विकासकामांना आणि नावावर बट्टा लावण्याचे पाप कंत्राटदार साबिर कन्स्ट्रक्शन व नगरपरिषदेचे संबंधित अभियंता (इंजिनिअर) संगनमताने करत आहेत, असा थेट आरोप सिद्दिकी यांनी केला आहे. या बोगस कामाची बिले तात्काळ रोखून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नवीदुद्दीन सिद्दिकी यांनी म्हटले आहे की, वॉर्ड क्रमांक ८ मध्ये नगरपरिषदेच्या माध्यमातून पेव्हर ब्लॉक गट्टू बसवण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, संबंधित कंत्राटदार 'साबिर कन्स्ट्रक्शन' कडून अत्यंत निकृष्ट, खराब आणि आधीच तुटलेले-फुटलेले पेव्हर ब्लॉक वापरून काम उरकले जात आहे. या कामाच्या मूळ शासकीय इस्टिमेटमध्ये (अंदाजपत्रकात) नाली आणि



नळकांडी बांधण्याचा स्पष्ट उल्लेख व तरतूद असताना, कंत्राटदार व अभियंत्याने नालीचे काम पूर्णपणे गायब केले आहे. मूळ आराखड्यानुसार नाली न बांधता, फक्त वर-वर पेव्हर ब्लॉक गट्टू बसवून शासनाचे लाखो रुपयांचे बोगस बिल लाटण्याचा मोठा गैरप्रकार कंत्राटदार आणि अभियंता मिळून करत आहेत. आमदार प्रकाश सोळंके यांच्या निधीतून होणाऱ्या कामाचा दर्जा उत्तम असावा ही जनतेची अपेक्षा असताना, कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे आमदारांच्या प्रतिमेला बट्टा लागत आहे. हे काम केवळ कागदोपत्री दाखवून शासनाची आणि माजलगावच्या सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करण्याचे कारस्थान सुरू आहे.

**अधिकारी आणि कंत्राटदारांचे संगनमत?**

कंत्राटदाराला पाठीशी घालत नगरपरिषदेचे संबंधित इंजिनिअर आणि मुख्य अधिकारी केवळ बोगस बिले उचलण्याच्या तयारीत असल्याचा थेट आरोप सिद्दिकी यांनी केला आहे. जनतेच्या पैशाची चाललेली ही उघड लूट थांबवण्यासाठी या कामाचे वरिष्ठ पातळीवरून 'थर्ड पार्टी ऑडिट' (निष्पक्ष चौकशी) होणे गरजेचे आहे.

प्रमुख मागण्या इस्टिमेटनुसार नाली व नळकांडीचे काम न करता बोगस बिले लाटणाऱ्या साबिर कन्स्ट्रक्शनचे सर्व देयके (बिले) तात्काळ रोखून धरावीत. आमदार निधीचा गैरवापर रोखण्यासाठी निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराला हटवून दुसऱ्या प्रामाणिक कंत्राटदाराकडून काम करून घ्यावे. आमदार महोदयांच्या कामाला बदनाम करणारे आणि शासकीय नियमांचे उल्लंघन करणारे संबंधित इंजिनिअर व कंत्राटदारावर तात्काळ गुन्हे दाखल करावेत. प्रशासनाने या गंभीर तक्रारीची दखल न घेतल्यास, समाजवादी पार्टी आणि महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेनेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभे केले जाईल, असा इशारा पत्रका शेवटी नवीदुद्दीन सिद्दिकी यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, मुख्यमंत्र्यांकडे तसेच दक्षता विभागाकडे पाठवण्यात आल्या आहेत.

## नगरपरिषदेवर मुस्लिम नेतृत्वाची सत्ता, तरीही बशीरगंज ते जुना बाजार रस्ता दुर्लक्षित का? नेमकी मजबुरी तरी काय?

### बीड नगरपरिषदेतील मुस्लिम नेतृत्वाला मौलाना आझाद सामाजिक फाउंडेशन बीड तालुकाध्यक्ष कझी मुहीबूर रहमान यांचा सवाल!

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बशीरगंज ते जुना बाजार या महत्त्वाच्या रस्त्याची दुरवस्था अद्याप कायम असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. नगरपरिषदेत मुस्लिम नेतृत्वाची सत्ता असतानाही या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नसेल, तर यामागचे नेमके कारण काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

बशीरगंज ते जुना बाजार हा परिसरातील नागरिक, व्यापारी, वाहनचालक आणि विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी होत आहे.



नगरपरिषदेत मुस्लिम नेतृत्व असताना मुस्लिमबहुल भागातील रस्त्यांचे प्रश्न सुटणार नसतील, तर या नेतृत्वाचा सामान्य नागरिकांना नेमका काय फायदा? असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ सत्तेत असणे पुरेसे नाही, तर नागरिकांच्या मूलभूत समस्यांचे निराकरण करणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे.

निवडणुकीच्या काळात नागरिकांना विकासाची आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात रस्त्यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना प्रतीक्षा करावी लागत असेल, तर ही बाब चिंताजनक आहे.

**नागरिकांचे थेट सवाल!**

नगरपरिषदेवर मुस्लिम नेतृत्व असतानाही बशीरगंज ते जुना बाजार रस्त्याचे काम अद्याप का झाले नाही?

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध नाही की प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे?

**संबंधित लोकप्रतिनिधी आणि नगरपरिषद प्रशासन या समस्येकडे गांभीर्याने लक्ष कधी देणार?**

सत्तेत असूनही विकासकामे होत नसतील, तर नेमकी मजबुरी कोणती? बशीरगंज ते जुना बाजार रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. संबंधित लोकप्रतिनिधी आणि नगरपरिषद प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता प्रत्यक्ष पाहणी करून कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आता आश्वासन नको, प्रत्यक्ष काम हवे! बशीरगंज ते जुना बाजार रस्त्याच्या दुरुस्तीबाबत नगरपरिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ठोस भूमिका कधी घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## मंत्री आले, बोलले, फोटो काढून गेले, मच्छीमाराची व्यथा कायम ! : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांचा आज बीड जिल्हाचा दुष्काळी दौरा झाला. पण हा दौरा मच्छीमाराच्या प्रश्नावर उपाय देणारा ठरला का, की फक्त फोटो सेशनपुरताच मर्यादित राहिला, हा प्रश्न जिल्ह्यातील मच्छीमार बांधव विचारत आहे. मंत्री राणे यांनी आज गेवराई तालुक्यातील गोविंद वाडी तलावाची आणि आष्टी तालुक्यातील सर्वात मोठ्या रूटी तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली. आमदार सुरेश धस, आमदार विजयसिंह पंडित, मत्स्य आयुक्त भानुदास पालवे, प्रादेशिक उपायुक्त सुरेश भारती, भाजप नेते तथा माजी मंत्री बदामराव पंडित, भाजप नेते



बाळराजे पवार आणि मोठ्या संख्येने मच्छीमार बांधव आणि महिला उपस्थित होते.

कमी पावसामुळे दोन्ही तलावातील पाण्याची पातळी कमी झाली आणि तलावातील मत्स्यबीज नष्ट झाल्याने उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. मच्छीमार महिलांनी स्वतः पुढे येऊन आपला व्यथा सांगितल्या, कागदपत्रे दाखवली, मंत्र्यांनी ते ऐकून घेतल्या, अधिकाऱ्यांना सूचना दिल्या, नुकसानीचा पंचनामा करा, घउउ आणि तलावातील गाळ काढा, दर्जेदार मत्स्यबीज द्या अशी आश्वासने देण्यात आली. पण मच्छीमाराचा थेट प्रश्न तसाच राहिला आश्वासने ऐकली, आता पोट कधी भरणार? गेल्या काही महिन्यापासून राज्यभरात मंत्र्यांचे दौरे सुरू आहे. संवाद आणि आश्वासने होतात पण प्रत्यक्षात मच्छीमाराच्या पदरी काय पडतं, याचे उत्तर अजून मिळालेलं नाही, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा स्वतंत्र पत्रकार शेख युनूस यांनी केला आहे. पुढे ते म्हणाले की, आता मच्छीमारांशी संवाद नको, सवलत हवी-न्याय हवा!

## सय्यद मुजीब A-१ यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

### पेठ बीड काँग्रेस विभागप्रमुखपदी निवड; संघटन बळकटीची जबाबदारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील राजकीय वर्तुळात महत्त्वाची घडामोड घडली असून, सय्यद मुजीबोद्दिन सय्यद मोहियोद्दिन शाह (--१) यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांची बीड शहर काँग्रेस कमिटीच्या पेठ बीड विभागप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली.

काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे, पक्षाची विचारधारा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि जनतेच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणे, ही जबाबदारी नवनियुक्त विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. पेठ बीड परिसरात पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी तसेच



कार्यकर्त्यांना संघटित करून पक्षाचे काम अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

केंद्र व राज्यातील भाजप सरकारच्या धोरणांवर टीका करताना काँग्रेसकडून महागाई, भ्रष्टाचार तसेच जातीय व धार्मिक तेढीच्या मुद्द्यांवर जनजागृती करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. देशात आणि राज्यात धर्मनिरपेक्षता, सामाजिक सलोखा आणि सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य देणारे सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेस संघटना मजबूत करण्याचे आवाहनही निवडपत्रातून करण्यात आले आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रजनीताई पाटील, महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला, बीड जिल्हा प्रभारी धीरज देशमुख तसेच माजी मंत्री अशोकरावजी पाटील व शहराध्यक्ष इलियास टेलर यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटना बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी आदित्य पाटील, गणेश बजगुडे, नगरसेवक वाजेद कुरेशी, सय्यद अलीम टेलर, शेख खमरोद्दीन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पेठ बीड परिसरातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेणे, नागरिकांना त्यांच्या हक्कांसाठी पक्षाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविणे, यासाठी सय्यद मुजीबोद्दिन सय्यद मोहियोद्दिन शाह (--१) सक्रियपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निवडीमुळे पेठ बीड परिसरातील काँग्रेस संघटनेला नवी दिशा मिळणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## परळीत वर्षावास समारोप, कठीण चीवरदान व धम्म रॅली उत्साहात

**सुगंधकुटी बुद्ध विहारातून निघालेल्या भव्य धम्म रॅलीने वेधले शहरवासीयांचे लक्ष; विद्यार्थ्यांचा सत्कार, भोजनदान व धम्ममय वातावरणात पुण्य महोत्सव साजरा**

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

तथागत गौतम बुद्धांच्या धम्मविचारांचा प्रसार, सामाजिक एकात्मता, समता आणि बंधुत्वाचा संदेश जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने भिमनगर येथील सुगंधकुटी बुद्ध विहारात आयोजित वर्षावास समारोप, कठीण चीवरदान व पुण्य महोत्सव २०२६ रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या निमित्ताने सकाळी ८ वाजता सुगंधकुटी बुद्ध विहारातून



भव्य धम्म रॅली काढण्यात आली. रॅलीत बौद्ध उपासक-उपासिका, महिला, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बुद्धवंदना, धम्मघोष आणि शिस्तबद्ध सहभागामुळे शहरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते. या रॅलीने शहरवासीयांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

या धम्म सोहळ्यास पू. भदंत डॉ. एच. आर. धम्मदीपजी महाथेरो, भिक्खू सुभद्र (हिंगोली), पू. भिक्खुणी रूपनंदाजी (हिंगोली), भिक्खुणी शीलरक्षिता (अकोला), भिक्खुणी धम्मसारा (आंध्र प्रदेश), पू. अय्याजी संबोधी (ग्वाल्हेर), पू. अय्याजी संघमित्रा (अकोला), पू. अय्याजी वैशाली (अकोला), भिक्खुणी सुबोधी (अमरावती) आणि पू. अय्याजी पारमिता (नागपूर) यांची उपस्थिती लाभली. वर्षावास काळात बौद्ध धम्मावर आधारित परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी कठीण चीवरदानाचा धार्मिक विधी पार पडला. असंख्य दानदात्यांनी दिलेल्या दानाच्या सहकार्यातून कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. उपस्थितांसाठी भोजनदानाचीही व्यवस्था करण्यात आली होती. जनकल्याण महिला मंडळ आणि सुगंधकुटी बुद्ध विहार, भिमनगर, परळी यांच्या सहकार्याने हा वर्षावास समारोप सोहळा उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात पार पडला. बुद्धांच्या प्रज्ञा, शील, करुणा आणि समतेच्या विचारांचा जागर करत या महोत्सवातून सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला.

## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक विषमता, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध केलेली ही एक वैचारिक आणि स्वाभिमानाची क्रांती होती : वडमारे

**बीड । प्रतिनिधी**

२० आक्टोबर २०२६ धम्मदीप बुद्ध विहार, शिवाजीनगर बीड येथे दरवर्षी प्रमाणे मोठया उत्साहात चक्रवर्ती सम्राट अशोका विजयादशमी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. सर्व प्रथम आदर्श तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे दीप धुपाने पूजन करून पुष्पहार अर्पण करून महिलामंडळा च्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर त्रिसरण, पंचशील, अष्टशील ग्रहण करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ आक्टोबर १९५६ रोजी धर्मांतरा नंतर दिलेल्या २२ प्रतिज्ञा चे सामूहिक पठण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी २२प्रतिज्ञा ची आचारसंहिता दिली त्याचा भंग



करणार नाहीत आशी शपथ घेण्यात आली.

ड तेजस वडमारे यांनी ७० व्या अशोकाविजयादशमी धम्मचक्र प्रवर्तन दिना मार्गदर्शन करताना म्हणाले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो सह नागपूर येथील दीक्षाभूमीवर बौध्द धम्म स्वीकारून जगातील सर्वात मोठे धर्मांतर केलेहे धर्मांतर जातीय विषमता, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध केलेली एक वैचारिक आणि स्वाभिमानाची क्रांती होती ही क्रांती तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोका नंतर ३ रे धम्मचक्र प्रवर्तन करून भारतातून लुप्त झालेला बुद्ध धम्म पुनर्जीवित करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले असे मनोगत व्यक्त केले त्यानंतर वर्षावासाचे ३रे वर्षा निमित्त ग्रंथ वाचन अंजली तेजस वडमारे यांनी ८३ व्या दिवशी वाचन करण्यात करून सरणंतय ने कार्यक्रम संपन्न करण्यात आला त्यावेळी आयु.सरिता गौतम खेमाडे, गौतम बाजीराव खेमाडे, अर्चना पप्पू जाधव, रमाबाई सोनवणे,सिद्धार्थ वडमारे, आर्यन साळवे, नागेश साळवे, आर्यन खेमाडे, आदर्श खेमाडे चेतन जाधव व बलभीम नगर, शिवाजीनगर परिसरातील उपासक- उपासिका बालक-बालिका उपस्थित होते.

## पाटोदा येथे काँग्रेस जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयासह ड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या विधी कार्यालयाचे आणि कै. ड. लक्ष्मणराव जाधव सेवाभावी संस्था कार्यालयाचे उद्घाटन आज, मंगळवार, दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यालयाचे उद्घाटन काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष जुबेर चाऊस, पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवाजीराव कोकाटे, आनंदराव कोकाटे, जिल्हा सचिव ड. विशाल मस्के, ड. चिखले, पत्रकार कादर चाऊस, पत्रकार विजय जाधव, बी.के. शिंदे सर, कल्याण भोसले, सिद्धेश्वर शिंदे, कैलास अनभुले, ड. तुषार जाधव, गणेश कवडे, ड. चंदन कांकरिया, तुषार कोकाटे, सुहास जाधव पाटील, मोबीन शेख, मुखराम पठाण, पांडुरंग टेकाळे, भाऊसाहेब येवले, अर्जुन तांबे, बापूराव जाधव, मधुकर येवले, मनोहर टेकाळे, आजिनाथ टेकाळे, सुनील कोकाटे, अमित पठाण, विकास भंडारे आणि बाळासाहेब कोकाटे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांना काँग्रेस पक्षाशी संबंधित कामांसाठी संपर्क साधता येणार आहे. तसेच ड. नरसिंह जाधव यांच्या विधी कार्यालयातून कायदेविषयक मार्गदर्शन आणि कै.ड. लक्ष्मणराव जाधव सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने कार्य केले जाणार आहे. उद्घाटनप्रसंगी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांवर काम करण्याबाबत शुभेच्छा व्यक्त केल्या.

## औरंगाबादच्या आयेशा उमराह टूरला मिळाला मलिक अंबर अवॉर्ड!

### अझर भाईंच्या कष्ट आणि हाजींच्या सेवेचा सन्मान वंदे मातरम हॉल येथे सन्मान समारोह संपन्न!

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

हज आणि उमराह यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूच्या सेवा उत्तम मार्गदर्शन व समर्पित कार्यांसाठी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील आयशा टूर्स हज उमराह यांना प्रतिष्ठेच्या मलिक अंबर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान ११ ऑक्टोंबर २०२६ रविवार रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील वंदे मातरम हॉल येथे आयोजित एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. या उपलब्धीमुळे सय्यद अझर व त्यांच्या टीम मध्ये आनंदाचे वातावरण आहे.





या सन्मान सोहळ्या वेळेस आनंद व्यक्त करताना सय्यद अझर यांनी खुदाचा शुक्र अदा करत आपले मत व्यक्त केले की, यात्रेकरू मक्का आणि मदिना या पवित्र शहराला उमराह यात्रेसाठी जाण्यासाठी नेहमी आयशा टूर्सला प्राधान्य देतात व त्यांचा विश्वास प्रेम यांच्या पुण्याईचा हा परिणाम आहे की त्यांच्यामुळे हा सन्मान आम्हास मिळाला सगळ्यात मोठ आमच्या टूर्सच यश हे आहे की आम्ही हे टूर्सचे काम एक पुण्याई समजून करतो या सन्मान सोहळ्यासाठी सय्यद अझर यांनी आयोजक अब्दुल गफारखान व जमीर अहमद कादरी सहित सर्व आयोजकांचे आभार व्यक्त केले. सय्यद अझर यांनी भविष्यात आयशा उमराह टूर्सच्या माध्यमातून पूर्ण इमानदारीने निष्ठेने व जबाबदारीने असेच काम करत राहण्याचा मनोदय व्यक्त केला आयशा टूर्स हा झालेला सन्मान हा यात्रेकरूंच्या प्रति असलेले समर्पण निष्ठा व सेवेसाठी केलेली तळमळ याची पोचपावती असल्याचं लोकांमध्ये भावना आहे!

## प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना!

### फेस ऑथेंटिकेशन होत नसल्यास कुटुंबातील पात्र सदस्याची पडताळणी शक्य; आवश्यक कागदपत्रांसह नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधा : माजी नगरसेवक सय्यद एजाज यांचे आवाहन

**गेवराई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घरकुलाचा लाभ घेणाऱ्या ज्या लाभार्थ्यांना विविध कारणांमुळे फेस ऑथेंटिकेशन (चेहरा पडताळणी) करण्यात अडचणी येत आहेत, त्यांच्यासाठी शासनाच्या मानक कार्यपद्धतीनुसार पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करून नियमानुसार अर्जाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन गेवराईचे माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत लाभार्थ्यांची ओळख पटविण्यासाठी फेस ऑथेंटिकेशन प्रक्रिया महत्त्वाची आहे. मात्र काही लाभार्थ्यांना शारीरिक अडचणी किंवा अन्य कारणांमुळे ही प्रक्रिया पूर्ण करता येत नाही. अशा परिस्थितीत पात्र लाभार्थ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिलासा मिळावा, यासाठी पर्यायी पडताळणीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.



**कोणत्या लाभार्थ्यांना मिळू शकते सुविधेचा लाभ?**

चेहऱ्याच्या रचनेत विकृती असणे, एका डोळ्याची पापणी लवण्यास अडचण येणे, लाभार्थी अंध असणे, अंथरुणाला खिळलेले असणे, रोजगार किंवा अन्य कारणामुळे दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होणे तसेच लाभार्थ्याचे वय ७० वर्षांपेक्षा जास्त असणे, अशा नमूद कारणांमुळे फेस ऑथेंटिकेशन होत नसल्यास संबंधित प्रकरण नियमानुसार सादर करता येईल. लाभार्थ्याचे स्वतःचे फेस ऑथेंटिकेशन होणे शक्य नसल्यास, योजनेच्या लागू मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र पती, पत्नी किंवा मुलांच्या चेहरा पडताळणीचा पर्याय उपलब्ध होऊ शकतो. मात्र त्यासाठी संबंधित प्रकरणाची तपासणी, पात्रतेची पडताळणी आणि सक्षम प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक राहणार आहे.

**जिओ-टॅगरकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता**

संबंधित लाभार्थ्याच्या प्रकरणाची नोंद करताना जिओ-टॅगरने लाभार्थ्याचा प्रत्यक्ष (लाइव्ह) फोटो काढणे, फेस ऑथेंटिकेशन न होण्याच्या कारणानुसार आवश्यक प्रमाणपत्र किंवा पुरावा अपलोड करणे आणि पीएमएवाय-यू पमधील संबंधित पर्यायाद्वारे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. जिओ-टॅगरकडून अर्ज सादर झाल्यानंतर तो संबंधित नगरपरिषद किंवा नगरपालिका प्रशासनाच्या लॉगिनवर पडताळणी व पुष्टीकरणासाठी पाठविला जाईल. त्यानंतर संबंधित प्राधिकरणाकडून अर्जाची तपासणी करून नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

**लाभार्थ्यांनी नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधावा**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घरकुलाचा लाभ घेणाऱ्या ज्या नागरिकांना फेस ऑथेंटिकेशन करताना अडचणी येत आहेत, त्यांनी संबंधित जिओ-टॅगर किंवा नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधावा. आवश्यक कागदपत्रे, प्रमाणपत्रे व पुरावे उपलब्ध करून देऊन अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी केले आहे.

**सूचना** - पर्यायी फेस ऑथेंटिकेशनची सुविधा केवळ नमूद केलेल्या पात्र कारणांसाठी आणि योजनेच्या लागू मार्गदर्शक सूचनांनुसार उपलब्ध होऊ शकते. अर्ज सादर केल्याने मंजुरी आपोआप मिळत नाही. अंतिम निर्णय संबंधित प्राधिकरणाच्या पडताळणी व मंजुरीनंतरच घेतला जाईल.

## दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी कळंबमध्ये राज्यस्तरीय मंथन; सामाजिक संस्थानी सहभागी व्हावे : हरी गिरी

**माजलगाव । शेख अखिल**

महाराष्ट्राला दुष्काळाच्या समस्येतून कायमस्वरूपी मुक्त करण्यासाठी, तसेच राज्याच्या दुष्काळमुक्त विकासाचा ठोस आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने कळंब येथे २८ व २९ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन दिवसीय राज्यस्तरीय 'महाराष्ट्र दुष्काळ निर्मूलन संकल्प २०२६' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकविकास मंचाच्या पुढाकारातून आयोजित या परिषदेत राज्यातील ५० हून अधिक सामाजिक संस्था, शेतकरी प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. त्या साठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आव्हान हरी गिरी अध्यक्ष मानव विकास संस्था शेलापुरी माजलगाव यांनी केले आहे.

या परिषदेच्या माध्यमातून दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने ठोस पावले उचलण्यावर भर दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांना सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. पाणीटंचाई, पावसाचे अनियमित प्रमाण, शेतीचा वाढता खर्च, ग्रामीण भागातील बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता दुष्काळ निर्मूलनासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत उपाययोजना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकविकास मंचाचे अध्यक्ष विश्वनाथ तोडकर यांच्या पुढाकारातून या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना कायमस्वरूपी दिलासा मिळावा, जलसंधारणाच्या कामांना गती मिळावी आणि ग्रामीण



भागाच्या विकासासाठी सर्वसमावेशक धोरण तयार व्हावे, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या दोन दिवसीय परिषदेत पाच एकरांपर्यंतच्या शेतीच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, प्रत्येक गावासाठी शाश्वत जलसंधारण, पशुधन व दुग्धव्यवसायाचा विकास, सामाजिक संस्था आणि कंपन्यांच्या सीएसआर निधीचा प्रभावी वापर, तसेच मराठवाड्यातील हक्काचे पाणी शेतीपर्यंत पोहोचविणे या महत्त्वाच्या विषयांवर विचारमंथन होणार आहे.

दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी लोकसहभाग, योग्य नियोजन, जलव्यवस्थापन आणि सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. गावपातळीवर जलसंधारणाची कामे, पाण्याचा काटकसरीने वापर, शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन आणि स्थानिक रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या उपाययोजनांवर परिषदेत विशेष भर दिला जाणार आहे. दुष्काळ ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून, योग्य नियोजन, लोकसहभाग आणि दीर्घकालीन उपाययोजनांच्या माध्यमातून त्याची तीव्रता कमी करणे शक्य आहे.

दुष्काळाच्या संकटावर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाला नवी दिशा देण्यासाठी कळंब येथे होणारी ही राज्यस्तरीय परिषद महत्त्वपूर्ण ठरण्याची अपेक्षा आहे. सदरील दुष्काळ परिषदेला राज्यातील जास्तीत जास्त संस्थानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मानव विकास संस्था शेलापुरी ता माजलगाव जि.बीडचे अध्यक्ष हरी गिरी माजलगाव यांच्या सह ओमप्रकाश गिरी एच.पी देशमुख केज भुमीपुत्र वाघ शांता जैन परभणी ज्ञानेश्वर पालकर बुलढाणा पंडीत बामणकर धाराशिव गर्वधन दराडे यांनी केले आहे.

# भीमाशंकर अभयारण्य परिसरातील प्रस्तावित टोरंट पॉवर प्रकल्पासाठी वृक्षतोडीला विरोध!

## पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या झाडखाऊ आणि भांडवलदार धार्जिण्या भाडखाऊ सरकारच्या निषेधार्थ बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने; प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात भीमाशंकर वन्यजीव अभयारण्याच्या पायथ्याशी असलेल्या सायडोंगर परिसरात प्रस्तावित टोरंट पॉवर प्रकल्पासाठी सुमारे ६०० एकर क्षेत्रातील ३५ हजारांहून अधिक वृक्षांची तोड होण्याची शक्यता असल्याचा आरोप करत या प्रकल्पाला पर्यावरणप्रेमींनी विरोध दर्शविला आहे. महाराष्ट्राचा राज्यप्राणी असलेल्या शेकरू (विशाल खार) या दुर्मिळ वन्यजीवाच्या नैसर्गिक अधिवासाला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त करत हा प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करावा, या मागणीसाठी सोमवारी (दि.२६) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या वेळी भांडवलदारधार्जिण्या धोरणांच्या निषेधार्थ घोषणाबाजी करत पर्यावरण आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली.

**शेकरूच्या नैसर्गिक अधिवासावर संकट येण्याची भीती**

भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य हे समृद्ध जैवविविधतेसाठी ओळखले जाते. या परिसरात महाराष्ट्राचा राज्यप्राणी असलेल्या शेकरूचा नैसर्गिक अधिवास आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्यास शेकरूसह इतर दुर्मिळ वन्यजीवांच्या अधिवासावर गंभीर परिणाम होण्याची भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. पश्चिम घाट हा पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील प्रदेश असून, येथील जंगलसंपत्ती, वन्यजीव आणि जैवविविधतेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. विकासाच्या नावाखाली घनदाट वनक्षेत्राचा ऱ्हास होणार असेल, तर अशा प्रकल्पांच्या पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास करूनच निर्णय घेण्यात यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.




**प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी**

प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेता शासनाने या प्रकरणात हस्तक्षेप करावा. वनक्षेत्रातील वृक्षतोड आणि वन्यजीवांच्या अधिवासावर होणाऱ्या संभाव्य परिणामांची निष्पक्ष चौकशी करावी. पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी प्रस्तावित प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक आणि पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांना पाठविण्यात आले.

**पर्यावरण संरक्षणासाठी घोषणाबाजी**

या आंदोलनादरम्यान 'पर्यावरण वाचवा, देश वाचवा', 'निसर्ग वाचवा, देश वाचवा' आणि 'झाडे लावा, झाडे जगवा' अशा घोषणा देण्यात आल्या. विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल राखताना नैसर्गिक वनसंपत्तीचा विनाश होणार नाही, याची काळजी शासनाने घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, सरफराज पठाण, रामनाथ खोड, शेख मुबीन, शिवशर्मा शेलार, नागेश मिठे पाटील, शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड माजी सैनिक अशोक येडे, शहराध्यक्ष आम आदमी पार्टी बीड सादेक सय्यद, राजेंद्र आमटे ( शेतकरी हक्क मोर्चा आंदोलक), सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, मराठवाडा अध्यक्ष राष्ट्रीय किसान सभा भिमराव कुटे, सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे, प्राचार्य डी.जी.तांदळे (जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय किसान सभा बीड), प्राचार्य राजकुमार कदम, कॉम्रेड सुहास जायभाये (जिल्हा कोषाध्यक्ष डीवायएफआय), कृष्णा राठोड यांच्यासह पर्यावरणप्रेमी अभिमान खरसाडे सहभागी झाले होते.

## नळ खुला सोडला तर गुन्हा, पण शहरात बऱ्याच ठिकाणी पाईपलाईन लिकेज आहे, तेली गल्ली तर वाहून चालली, गुन्हा कोणावर करायचा ? : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**



नगरपरिषद ने नळ खुला सोडल्यास थेट गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला. पाण्याची नासाडी करण्यारावर कारवाईचा बडगा उगारला आहे. दोन तासाच्या पाणीपुरवठ्यासाठी विशेष गस्ती पथकेही नेमली आहेत. पण शहरातीलच पाईपलाईन ठीक ठिकाणी गळत असून, लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असताना गुन्हा फक्त नागरिकावरच का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ता तथा स्वतंत्र पत्रकार शेख युनूस यांनी उपस्थित केला आहे.

शहरातील तेली गल्ली गेल्या अनेक महिन्यापासून मुख्य पाईपलाईन फुटून पाणी वाहत आहे. नागरिकांनी तक्रार करूनही प्रशासनाकडून दुरुस्ती होत नाही. पिण्याचे पाणी गटारात मिसळत आहे. रस्ता चिकलमय झाला आहे. हीच परिस्थिती शहरातील



बऱ्याच भागात आहे. इंजिनीयर माने साहेब यांना फोन लावला तर हे उचलत नाही आणि उडवा उडवीचे उत्तरे देत आहे. गळतीमुळे होणारी पाण्याची नासाडी ही अनधिकृत कितीतरी पटीने मोठी आहे. उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी माध्यमाची बोलताना म्हटले आहे की, मुख्य जलवाहिनीवर बळजबरीने अनधिकृत नळ कनेक्शन घेतले जात आहेत. त्यामुळे पाण्याची नासाडी होते, त्यांच्यावर थेट गुन्हा दाखल करू, मात्र नागरिक विचारतात, प्रशासनाच्या मालकीची पाईपलाईन गळून पाणी वाया जात असताना त्याची जबाबदारी कोणाची? गळती दुरुस्ती न करणाऱ्या वर गुन्हा का नाही? शेख युनूस म्हणाले, आधी शहरातील लिकेज बंद करा, फुटलेले पाईप बदला, गळतीमुळे वाहणारे पाणी थांबवा, मग नागरिकांना गुन्ह्याची भाषा करा. तेली गल्ली तर पाणी वाहून चालले आहे. तिथे गुन्हा कोणावर करायचा? नागरिकांवर गुन्हा दाखल करण्यापूर्वी स्वतःच्या यंत्रणेची तपासणी करा. नागरिकांमध्येही यामुळे संताप आहे, एकीकडे दोन तास पाण्यासाठी वणवण, दुसरीकडे रस्त्यावर पाण्याचा पूर, पाण्याची नासाडी प्रशासनाकडून होते. आणि जबाबदारी मात्र नागरिकावर टाकली जात आहे. असा आरोप त्यांनी केला. शेख युनूस यांनी मागणी केली आहे की, नगरपरिषद मे तातडीने शहरातील सर्व लिकेज शोधून दुरुस्ती करावेत. फुटलेल्या पाईपलाईन बदलाव्यात आणि मगच पाणी जपून वापरण्याचे आवाहन करावे. गुन्ह्याची धमकी देण्या पूर्वी स्वतःची घरटी साफ करावी.

## शहरातील जलकुंभ कालबाह्य : बीड शहर बचाव मंच

### अमृत जल योजनेतील जलकुंभ व पाणीपुरवठा यंत्रणेची वापरा अभावी गुणवत्ता धोक्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेच्या वतीने करावयाचे, अटल अमृत जल योजनेतील काम अपूर्ण राहिलेले आहे. या संदर्भात काही नेते, लोकप्रतिनिधी जरी कोर्टात गेलेले असले तरी, एक गोष्ट सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे वास्तविकपणे ज्यावेळी हे लोक कोर्टात गेलेले आहेत त्या वेळेपर्यंत अटल अमृत जल योजनेतून बांधण्यात आलेले सर्व जलकुंभ व पाणी पुरवठा यंत्रणा ही अतिशय दुरावस्थेला पोहोचलेली आहे. योग्य वेळी या योजनेतून निर्माण केलेल्या सामग्रीच्या वापराची सुरुवात न करण्यात आल्यामुळे तसेच नियमित वापराअभावी ही सर्व यंत्रणा धूळ खात व गंज खात पडलेली आहे.



वेळेवर व नियमितपणे वापर न झाल्यामुळे या सर्व जलकुंभ, जलवाहिन्या तसेच पुरवठा यंत्रणा सामग्री यांची गुणवत्ता खराब झालेली आहे. म्हणजेच नजीकच्या भविष्यकाळामध्ये या सर्व यंत्रणेचे डीमोलीशन करणे गरजेचे होऊ शकते. मग अशा परिस्थितीमध्ये आणि इतक्या उशिरा नगरपालिकेच्या विरोधात कोर्टामध्ये जाऊन जरी कोर्टाचा निर्णय आला तरी या सर्व पाणीपुरवठ्याच्या यंत्रणेचा प्रत्यक्षात काहीही उपयोग होणार नाही. मग कोर्टकचेऱ्यांचा बनाव करून खरोखरंच प्रत्यक्षात जनतेच्या घरापर्यंत पाणी येणार आहे का ?? अटल अमृत जल योजना घोटाळ्याची जबाबदारी कोणाची ? या घोटाळ्यात कोणाकोणाचे हात गुंतलेले आहेत ? शहरातील सर्वच भागांमध्ये नियमितपणे लोकांच्या घरापर्यंत पाणी कधी येणार ? आता पडलेल्या दुष्काळामध्ये पाणीपुरवठा कसा होणार, या वरील उपाययोजना काय आहेत ?

बीड शहरातील आता कार्यान्वित असलेले अनेक जलकुंभ (उदाहरणार्थ, राजीव गांधी चौकातील जलकुंभ) तांत्रिकदृष्ट्या हे कालबाह्य झालेले आहेत. म्हणजेच तांत्रिकदृष्ट्या यांचा उपयुक्तता कालावधी बऱ्याच काळापूर्वी संपुष्टात आलेला असून या सर्वच जुन्या झालेल्या जल कुंभांची वापर मुदत फार पूर्वीच संपुष्टात आलेली आहे. आता यांचा जो वापर चालू आहे तो नियमबाह्य, कालबाह्यही आहे. वास्तविक शहराची वाढलेली व्याप्ती व लोकसंख्येचा विस्तार लक्षात घेऊन सर्व जल कुंभांचे पुनर्निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणजेच शहरांमध्ये नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी फार मोठे आव्हान स्वीकारण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. या सर्व परिस्थितीवर बीड शहरातील जनतेने जागृत होणे व अतिशय गंभीर होणे गरजेचे आहे.

## शेतकरी अण्णासाहेब तौर यांना डॉ.धनंजय थावरे यांनी दिले जीवदान

**बाजार समिती कार्यालयामध्ये सत्कार संपन्न**

**माजलगाव । शेख अखिल**

माजलगाव तालुक्यातील काळेगावथडी येथील शेतकरी अण्णासाहेब तौर यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून दिनांक १९ ऑक्टोबर रोजी फाशी घेऊन जीव संपवण्याचा प्रयत्न केला होता परंतु सायंकाळी ०५ वाजता छ.संभाजी चौक येथील त्यांना थावरे मल्टी हॉस्पिटल येथे ऍडमिट केल्यानंतर डॉ. धनंजय थावरे व डॉक्टर रोहिणी थावरे यांनी अथक परिश्रम घेऊन आज दिनांक २३ ऑक्टोबर रोजी रुग्ण धोक्याच्या बाहेर आणला असून त्या रुग्णाला नवीन जीवदान दिले आहे. त्याबद्दल माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती



कार्यालयामध्ये डॉक्टर धनंजय थावरे व डॉक्टर रोहिणी थावरे यांचा त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून त्यांना पाठबळ मिळावे यासाठी त्यांचा सत्कार बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, संचालक प्रभाकरराव होके, भगवानराव आगे, कदीरभाई पठाण, सचिव हरिभाऊ सवणे, यांच्या हस्ते दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी आपल्या मनोगतांमध्ये आपल्या हातून गोरगरिबांची सेवा घडावी व आपणास रुग्ण सेवेसाठी कोणतीही अडचण भासल्यास आम्ही खंबीरपणे आपल्या पाठीशी उभे राहू तसेच कोणत्याही शेतकऱ्यांनी आत्महत्या सारखे कठोर पाऊल उचलू नये असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते नवनाथ धाईजे, पट्टेकर, करीम भाई कुरेशी, शेख बाबा, फिरोज भाई, अशोकराव माने, लहू तांबे, विजय धाईजे, आकाश माने यांच्यासह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## तहसीलदार आणि BDO च्या आदेशाला केराची टोपली!

### चकलांबा ग्रामपंचायतीची मुजोरी, अमीरबाबा दर्ग्यात पाणी देण्यास नकार – हुकूमशाही कारभारावर भाविक संतप्त

**चकलांबा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील चकलांबा ग्रामपंचायतीच्या हुकूमशाही आणि मुजोर कारभाराचे आणखी एक उदाहरण समोर आले आहे. अमीरबाबा दर्ग्यातील पाणी टंचाई संदर्भात सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार असलम महेबुब सय्यद यांनी दि. १४/१०/२०२६ रोजी केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेत तहसीलदार आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (इऊज) यांनी चकलांबा ग्रामपंचायतीला लेखी आदेश देऊनही, ग्रामपंचायतीने त्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे.

चकलांबा येथील प्रसिद्ध अमीरबाबा दर्ग्यात भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण होती. याबाबत असलम सय्यद यांनी वरिष्ठांकडे तक्रार केली. तक्रारीची दखल घेत पंचायत समिती, गेवराईचे गटविकास अधिकारी यांनी जा.क्र.३४९५/ दि.१६/१०/२०२६ अन्वये चकलांबा ग्रामपंचायतीला स्पष्ट आदेश दिला



की, आपल्याला मंजूर असलेल्या टँकरपैकी १ खेप पाणी नियमानुसार तात्काळ अमीरबाबा दर्ग्यात टाकावे आणि त्याचा अहवाल सादर करावा.

**आदेश येऊनही पाणी नाहीच**

इऊज साहेबांचा हा लेखी आदेश येऊन २ दिवस उलटले तरी चकलांबा ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांनी दर्ग्यात एक थेंबही पाणी टाकले नाही. हा थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचा अवमान असून, ग्रामपंचायतीची मुजोरी आणि हुकूमशाही प्रवृत्ती यातून दिसून येते. एका धार्मिक स्थळाला, जिथे दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी येतात, तिथे पाणी नाकारणे हे अत्यंत निंदनीय आहे. तहसीलदार मॅडम आणि इऊज साहेबांच्या आदेशालाच जर ग्रामपंचायत जुमानत नसेल, तर सामान्य जनतेचे काय होणार? असा सवाल भाविक आणि ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे.

**आता कारवाईकडे लक्ष**

या प्रकरणी निर्भीड पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्ष देवेंद्र ढाका यांनी पुन्हा वरिष्ठांकडे धाव घेण्याचा निर्णय घेतला आहे. आता तहसीलदार मॅडम आणि इऊज साहेब चकलांबा ग्रामपंचायतीच्या या मुजोरीवर काय कारवाई करणार? सरपंच आणि ग्रामसेवकावर शिस्तभंगाची कारवाई होणार का? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. ग्रामपंचायतीने तात्काळ दर्ग्यात पाणी न टाकल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही भाविकांनी दिला आहे.

## दिवाळीपूर्वी नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करा!

**वेतन, महागाई भत्ता, १५ हजार रुपये सणअग्रिमसह सहा प्रमुख मागण्यांसाठी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे निवेदन**

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर परळी नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अशी मागणी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या नगर परिषद शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेचे अध्यक्ष प्रशांत रमेश जगतकर व महासचिव विशाल वसंत बनसोडे यांनी संबंधित प्रशासनाला निवेदन दिले आहे. या निवेदनात सहा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत. यामध्ये २ नोव्हेंबर २०२६ पर्यंत ऑक्टोबर महिन्याचे वेतन व थकीत महागाई भत्ता फरकाची रक्कम अदा करावी, प्रलंबित धुलाई व शिलाई भत्ता वेतनात समाविष्ट करून फरकाची रक्कम द्यावी, तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याला १५ हजार रुपये सणअग्रिम मंजूर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, ६ मे २०२६ रोजीच्या शासन आदेशानुसार कर्मचाऱ्यांची डीसीपीएस खाती उघडून खाते क्रमांक द्यावेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य (घरकुल) योजना राबवावी आणि २००५ नंतर लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना स्थायी नियुक्ती आदेश द्यावेत, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण असल्याने नगर परिषद प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सर्व मागण्या तातडीने मान्य कराव्यात. कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा देऊन त्यांना दिवाळीचा सण आनंदात साजरा करता यावा, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. या निवेदनाच्या प्रती नगराध्यक्षा, उपनगराध्यक्षा, विविध राजकीय पक्षांचे गटनेते तसेच नगर परिषद सदस्यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. आता नगर परिषद प्रशासन या मागण्यांवर काय निर्णय घेते, याकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## बीडमध्ये ७० वा धम्मदीक्षा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा बीड पश्चिमच्या वतीने मंगळवार, दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी ७० वा धम्मदीक्षा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त धम्मध्वजारोहण, धम्मचक्र अनुप्रवर्तन मिरवणूक, बावीस प्रतिज्ञा आणि सामूहिक पंचशील ग्रहणाचे आयोजन करण्यात आले.

सकाळी ८.३० वाजता बीड बसस्थानकालगतच्या बौद्ध विहारात महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंगदादा निकाळजे यांच्या हस्ते धम्मध्वजारोहण करून मिरवणुकीला सुरुवात झाली. तथागत गौतम बुद्ध, प्रियदर्शी सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा सजवलेल्या धम्मरथातून ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, कारंजा रोड आणि माळी वेस मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आली.

तेथे बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून धम्मध्वजारोहण करण्यात आले. बौद्धाचार्य गौतम खेमाडे यांनी उपस्थितांना बावीस प्रतिज्ञा दिल्या. भिक्खू धम्मशील थेरो, डॉ. इंदवंस्स महाथेरो, विपश्यनाचार्य डॉ. सुमनवन्नो महाथेरो, डॉ. खेमधम्मो महाथेरो आणि बुद्धघोष संघानी यांनी पंचशील व शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मिरवणूक सुभाष रोडमार्गे साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापर्यंत पोहोचली. तेथे पुष्पहार अर्पण, धम्मध्वजारोहण आणि मानवंदनेनंतर सामूहिक पंचशील व सरणत्रय ग्रहण करून मिरवणुकीची सांगता झाली. मिरवणुकीचे नियोजन व संचलन बौद्धाचार्य गौतम खेमाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक आणि धम्म अनुयायांनी सहकार्य केले. सर्व सहकार्यकर्त्यांचे अध्यक्ष महालिंगदादा निकाळजे यांनी आभार मानले.



## बोरफडीच्या शाळा इमारतीसाठी डॉ. अरुण घुगे दाम्पत्याकडून १० हजार विटांचे योगदान

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांना शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळावे, या उद्देशाने सरपंच कैलास घुगे यांच्या संकल्पनेतून मौजे बोरफडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नवीन वर्गखोल्यांची उभारणी लोकसहभागातून करण्यात येत आहे. या उपक्रमासाठी गावचे भूमिपुत्र तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण घुगे आणि डॉ. जयश्री अरुण घुगे यांनी एकत्रितपणे १० हजार विटांचे योगदान दिले आहे. त्यांच्या या सहकार्यामुळे शाळेच्या बांधकामाला मोलाचा हातभार लागला असून ग्रामस्थ आणि शिक्षणप्रेमींकडून त्यांच्या दातृत्वाचे कौतुक होत आहे.



शाळा ही केवळ चार भिंतींची इमारत नसते, तर ती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारे आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया घडविणारे ज्ञानमंदिर असते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, या हेतूने बोरफडी येथे नवीन शाळाखोल्यांची उभारणी सुरू आहे. सरपंच कैलास घुगे यांनी या कामासाठी पुढाकार घेतला असून ग्रामस्थ आणि शिक्षणप्रेमींच्या सहकार्यातून हा उपक्रम आकार घेत आहे. या शैक्षणिक कार्यात डॉ. अरुण घुगे आणि डॉ. जयश्री अरुण घुगे यांनी दिलेले १० हजार विटांचे योगदान विशेष महत्त्वाचे ठरले आहे. समाजातील पुढील पिढीच्या शिक्षणासाठी आपापल्या परीने योगदान देण्याची भावना त्यांच्या या सहकार्यातून दिसून येते. शाळेच्या उभारणीसाठी त्यांनी दिलेल्या या मदतीबद्दल शाळा परिवार आणि ग्रामस्थांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

**'विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हि वीट महत्त्वाची'**

शाळेच्या इमारतीसाठी दिलेली प्रत्येक वीट ही केवळ बांधकामाचा भाग नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या उभारणीतील एक महत्त्वाचे योगदान आहे. लोकसहभागातून सुरू असलेला हा उपक्रम ग्रामस्थांमध्ये शिक्षणाविषयीची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणारा ठरत आहे. डॉ. अरुण घुगे आणि डॉ. जयश्री घुगे यांच्या योगदानातून इतर दानशूर व्यक्ती, माजी विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमींनाही शाळेच्या विकासासाठी पुढे येण्याची प्रेरणा मिळू शकते.

बोरफडीतील या उपक्रमामुळे शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये भर पडण्यास मदत होणार असून विद्यार्थ्यांना अधिक चांगले शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना बळ मिळणार आहे. शाळेच्या विकासासाठी योगदान देणारे डॉ. अरुण घुगे व डॉ. जयश्री घुगे, पुढाकार घेणारे सरपंच कैलास घुगे तसेच सहकार्य करणारे ग्रामस्थ आणि शिक्षणप्रेमी यांचे शाळा परिवाराच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. लोकसहभागातून उभे राहत असलेले बोरफडीचे हे ज्ञानमंदिर म्हणजे ग्रामविकास, दातृत्व आणि शिक्षणाप्रती असलेल्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरत आहे.




साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com